नि.फौ.ख.क्र. ३८२/२०२४
सरकार/ प्रदीप शेटे
नि.क्र.३५
साक्षीदार क्र.१

शपथेवर सांगतो की,
माझे नावः– संदीप धनशेट्टी शेटे
वय– ४२ वर्षे, धंदा– टायपिस्ट
रा. वारणाली, विद्यानगर, सांगली.

<u>सरतपास सरकार तर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एम.डी.बागल यांचेमार्फत</u> –

१. सन २०२४ मध्ये मी वर नमूद पत्यावर राहण्यास होतो. माझ्या घरी मी, माझी पत्नी, दोन मुली, एक मुलगा व आई असे असतो. २०२४ माझे राजवाडा कोर्ट येथे टायपिंगचे दुकान होते. आरोपी क्र.१ हा माझा चुलतभाऊ आहे. त्याचेही माझ्या शेजारी टायपिंगचे दुकान आहे. घटना २०२४ मधील एप्रिल महिन्यात ५.३० ते ६ च्या दरम्यान घडली. त्यावेळी माझी व आरोपीमध्ये किरकोळ वादावादी झाली होती. त्यावेळी आमच्यात दुकानवाटपावरुन किरकोळ वादावादी झाली होती. वादावादीनंतर आम्ही दोघेही तिथून निघून गेलो. त्यावेळी माझी पत्नी माझ्या घरी होती. त्यावेळी केवळ आरोपी क्र.१ व माझ्यामध्ये वादावादी झाली होती. मी आरोपी क्र.२ ते ४ यांना ओळखतो. आरोपी क्र.१ ते ४ यांनी मला व माझ्या पत्नीला मारहाण केली, धमकी दिली, शिवीगाळ केली अशी घटना घडलेली नाही. सचिन अथणी हा माझा मेहुणा असून तो नांद्रे येथे राहण्यास आहे. दिनांक ०३/०४/२०२४ रोजी सायंकाळी ५ च्या दरम्यान मी माझ्या दुकानात काम करत असताना आरोपी क्र.१ याने मेहूण्याने केलेली तक्रार माघार घेण्यासाठी काठीने व लाथाबुक्यांनी मारहाण केली तसेच माझ्या पत्नीला देखील शिवीगाळ केली असे काही घडले नाही. मी किरकोळ वादावादीमुळे मी आरोपींविरुध्द पोलीसात फिर्याद दाखल केली होती. आता मला अभिलेखावरील फिर्याद व वर्दीजबाब दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला ठाऊक नाही. **फिर्याद व वर्दीजबाबाला सहीपुरते अनुक्रमे पी.१/पी.डब्ल्यू.१ व पी.२/पी.डब्ल्यू १ देण्यात येते**.

**(साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी वकिलांनी**

**साक्षीदारास उलट तपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)**

२. माझ्या मेहुण्याने आरोपी क्र.१ विरुध्द एप्रिल २०२४ च्या पूर्वी ६ महिने फिर्याद दाखल केली होती किंवा हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे, आरोपी माझ्या वर माझ्या मेहुण्यावर चिडून होता. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०३/०४/२०२४ रोजी सायंकाळी ५ च्या सुमारास आरोपी क्र.१ हा दारु पिवून माझ्या दुकानाबाहेर आला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ मला म्हणाला की मेहुण्याने केलेली तक्रार मागे घ्यायला सांगून शिवीगाळ करु लागला व दुकाना शेजारील काठी घेवून माझ्या अंगावर धावून आला व मला काठीने उजव्या हाताच्या मनगटावर व डाव्या हातावर मारहाण करुन निघून गेला. हे म्हणणे खरे नाही की, सर्व प्रकार मी माझ्या पत्नीला फोन करुन सांगितला व तिला दुकानात बोलवून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ हा आरोपी क्र.२ ते ४ यांना घेवून आला व पुन्हा मला लाथाबुक्यांनी मारहाण करु लागला व शिवीगाळ करु लागला. हे म्हणणे खरे नाही की, माझी पत्नी धनश्री ही भांडणे सोडवायला आला असता आरोपींनी माझ्या पत्नीला शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी देवून निघून गेले. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझी पत्नी मिळून सांगली शहर पोलीस ठाण्यात फिर्याद देण्याकरीता गेलो असता पोलीसांनी आम्हाला उपचारासाठी सांगली सिव्हील हॉस्पीटल येथे पाठवले व तेथून उपचार घेवून आल्यानंतर आम्ही फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, अभिलेखावरील फिर्याद ही तिच असून त्यातील मजकूर का माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदवलेला आहे. आता मला माझ्या वर्दीजबाबातील अधोरेखांकीत भाग अ दाखविण्यात आला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. तो पोलीसांनी का नमूद केला याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०६/०४/२०२४ रोजी घटनास्थळी पंचनामा व जप्ती पंचनामा तयार करण्यात आला व त्यावेळी मी घटनास्थळ पोलीसांना दाखवले. हे म्हणणे खरे नाही की, विक्रम पवार व विकास पाटील या पंचासमक्ष पंचनामा तयार करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी लाकडी भरीव पट्टी व काठी पोलीसांनी माझ्यासमक्ष जप्त केली. आता मला सदरचा पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकूर मला ठाऊक नाही. त्यावर माझी केवळ सही आहे. सदर **पंचनाम्यास ओळखीपुरते निशाणी पी.३/पी.डब्ल्यू.१** देण्यात येत आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने पोलीसांनी माझा दिनांक ०८/०४/२०२४ रोजी पुरवणी

जबाब नोंदवला किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद नोंदवतेवेळी आरोपी क्र.२ ते ४ यांची नावे माहिती नव्हती ती पोलीसांनी मला तपासादरम्यान सांगितली व त्यानुसार माझा पुरवणी जबाब नोंदवून आरोपींची ओळख पटवून घेतली. आता मला माझ्या पुरवणी जबाबातील अधोरेखांकीत भाग ब दाखविण्यात आला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. तो पोलीसांनी का नमूद केला याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमच्यामध्ये तडजोड झाली असून आमचे आपसात मिटलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे पुरसिस दाखल आहे व त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ हा माझा चुलत भाऊ असून त्याला शिक्षा होवू नये म्हणून मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला मराठी लिहिता वाचता येते व कोणत्याही कागदावर सही करण्यापूर्वी मी तो वाचून पाहत असतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर कामातील फिर्याद व वर्दीजबाबावर मी तो वाचूनच सही केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेनंतर मी दवाखान्यात गेलो होतो. मी गाडीवरुन घसरुन पडल्यामुळे मला जखमा झालेल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मारहाण केल्यामुळे मला जखमा झालेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला मारहाण केलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे श्री.आर.आर.शिंपी यांनी नाकारला.**

**वाचून पाहिले.**

__________

**साक्षीदाराची सही**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

**सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.**

ONKAR SANJAY SHASTRI Digitally signed by ONKAR SANJAY SHASTRI Date: 2026.04.09 17:38:55 +0530

**(ओंकार सं. शास्त्री)**

**दिनांक–०९/०४/२०२६**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,सांगली**

**(न्यायालय क्र.५)**